Amit R. Bijwe Mob.: 9422917360
FISH O FISH AQUARIUM
Up to 20% Discount
Dog Food Accessories
• Pedigree • Royal Canin • N&D • Whiskas • SmartHeart • Me-O
Birds Cages
•Fishes •Fancy Imported Tank •Aquarium Accessories
Ganesh colony, Shilangan Road, (Ravi Nagar Road) Amt. ☎ : 2562939

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
# हिंदुस्थान
७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे
www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

LiTTLE Millennium Camp Road
ADMISSION 2026-27 OPEN
7499440176
Gulmohar colony opp Vidhya Bharti college Camp Road Amravati

■ वर्ष ७६ वे/अंक २९० वा ■ ■ अमरावती,सोमवार दिनांक ८ जून २०२६ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर १८ ज्येष्ठ १९४८ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■

किलो प्रमाणे मिळेल
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत
सागर प्लास्टिक
100% होलसेल भावात
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
मल्टी मॉल
चित्रा चौक, फुटाणा लाईन, अमरावती
इस से सस्ता और अच्छा कही नही
8184057777
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
किलो प्रमाणे मिळेल ९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत

## विशेष संपादकीय

## विधान परिषद : लोकशाहीची गरज की राजकीय पुनर्वसन केंद्र?

भारताच्या लोकशाही व्यवस्थेत संसद आणि विधानमंडळांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासन चालविण्याची ही व्यवस्था जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा पाया मानली जाते. मात्र काळ बदलत असताना लोकशाही संस्थांचे पुनर्मूल्यांकन करणेही तितकेच आवश्यक ठरते. त्यापैकीच एक प्रश्न म्हणजे विधान परिषद खरोखर आवश्यक आहे का?

आज भारतात २८ राज्यांपैकी केवळ ६ राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात आहे, तर उर्वरित २२ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश विधान परिषदेशिवाय यशस्वीपणे प्रशासन चालवत आहेत. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये विधान परिषद आहे. तर गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हरियाणा, पंजाब, हिमाचल प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल यांसारखी अनेक महत्त्वाची राज्ये विधान परिषदेशिवाय व्यवस्थित चालत आहेत.

अशा परिस्थितीत सामान्य नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे की, जे काम २२ राज्ये विधान परिषदेशिवाय करू शकतात, तेच काम महाराष्ट्रासारखे राज्य दोन सभागृहांच्या मदतीने का करते? आणि त्यासाठी होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च खरंच न्याय्य आहे का?

भारतीय संविधानाने राज्यांना विधान परिषद स्थापन करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार दिला आहे. याचा अर्थ संविधान निर्मात्यांनीही विधान परिषद ही अपरिहार्य संस्था मानलेली नाही. परिस्थितीनुसार तिची आवश्यकता तपासण्याचा अधिकार राज्यांना दिला आहे.

विधान परिषदेच्या समर्थकांचे म्हणणे आहे की ती एक पुनर्विचार करणारे सभागृह आहे. विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांचे बारकाईने परीक्षण करण्याचे काम परिषद करते. शिक्षक, पदवीधर, स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञांना प्रतिनिधित्व मिळते, असा युक्तिवाद केला जातो. परंतु वास्तवात परिस्थिती वेगळी दिसून येते.

विधान परिषदेला कोणतेही सामान्य विधेयक कायमस्वरूपी नाकारण्याचा अधिकार नाही. ती केवळ काही काळासाठी ते अडवू किंवा विलंब करू शकते. अंतिम निर्णयाचा अधिकार विधानसभेकडेच असतो. वित्तीय विधेयकांच्या बाबतीत तर विधान परिषदेची भूमिका आणखी मर्यादित असते. ती केवळ सूचना देऊ शकते; त्या स्वीकाराव्यात की नाही याचा निर्णय विधानसभेचा असतो.

म्हणजेच विधान परिषद ही अंतिम निर्णय घेणारी संस्था नसून सल्लागार आणि विलंब निर्माण करणारी संस्था म्हणूनच कार्यरत असते.

यामुळे अनेकदा प्रश्न उपस्थित केला जातो की, जर एखाद्या संस्थेला अंतिम निर्णयाचा अधिकारच नसेल, तर तिच्यावर होणारा प्रचंड खर्च जनतेच्या पैशांचा योग्य वापर म्हणता येईल का?

महाराष्ट्रात दरवर्षी विधान परिषद चालविण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. सदस्यांचे वेतन, भत्ते, कार्यालयीन कर्मचारी, प्रवास खर्च, निवास व्यवस्था आणि इतर सुविधा यासाठी मोठा निधी खर्च होतो. हा पैसा शेवटी करदात्या नागरिकांच्या खिशातूनच येतो.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे विधान परिषद अनेकदा राजकीय पुनर्वसनाचे केंद्र बनल्याचा आरोप होत असतो. निवडणुकीत पराभूत झालेले नेते, पक्षनिष्ठ कार्यकर्ते किंवा मंत्रिपदासाठी आवश्यक असलेले राजकारणी यांना विधान परिषदेमार्फत सत्तेच्या केंद्रात प्रवेश दिला जातो. त्यामुळे अनेकांच्या मते ही संस्था लोकशाहीपेक्षा राजकीय सोयीचे साधन बनत चालली आहे.

लोकशाहीचा मूलभूत सिद्धांत असा आहे की जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी शासन चालवावे. परंतु विधान परिषदेतील अनेक सदस्य थेट जनतेकडून निवडलेले नसतात. त्यामुळे त्यांच्या लोकप्रतिनिधित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते.

गुजरात आणि मध्य प्रदेश ही महाराष्ट्राची शेजारी राज्ये आहेत. दोन्ही राज्ये औद्योगिक, आर्थिक आणि प्रशासकीयदृष्ट्या वेगाने प्रगती करत आहेत. त्यांच्याकडे विधान परिषद नाही. तरीही त्यांच्या कायदेनिर्मिती प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही. उलट निर्णय प्रक्रिया अधिक जलद आणि खर्चिकदृष्ट्या कमी असल्याचे दिसून येते.

जगातील अनेक प्रगत लोकशाही व्यवस्थांमध्येही एकच सभागृह प्रभावीपणे काम करत आहे. त्यामुळे लोकशाही टिकवण्यासाठी दोन सभागृहांची आवश्यकता आहेच, असे नाही.

तथापि विधान परिषद पूर्णपणे निरुपयोगी आहे, असे म्हणणेही योग्य ठरणार नाही. शिक्षण, साहित्य, समाजकारण, विज्ञान, उद्योग, कृषी यांसारख्या क्षेत्रातील तज्ज्ञांना विधिमंडळात स्थान मिळवून देण्याची क्षमता या संस्थेत आहे. प्रश्न संस्थेच्या अस्तित्वाचा नसून तिच्या उपयुक्ततेचा आणि कार्यक्षमतेचा आहे.

जर परिषद खरोखरच तज्ज्ञांचे व्यासपीठ बनली, सरकारच्या निर्णयांवर प्रभावी नियंत्रण ठेवले, सखोल चर्चा घडवून आणली आणि जनहिताच्या प्रश्नांवर विधायक भूमिका घेतली, तर तिचे महत्त्व निश्चितच वाढू शकते. परंतु जर ती केवळ राजकीय नियुक्त्यांचे केंद्र आणि पराभूत नेत्यांसाठी पर्यायी प्रवेशद्वार बनली, तर तिच्या अस्तित्वाचे औचित्य पुन्हा तपासावे लागेल.

आज देश आर्थिक आव्हानांचा सामना करत आहे. विकासासाठी निधीची गरज आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, पायाभूत सुविधा यांसाठी मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता आहे. अशा वेळी प्रत्येक सार्वजनिक संस्थेची उपयुक्तता आणि खर्च यांचा ताळेबंद मांडणे आवश्यक ठरते.

विधान परिषद हा केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक आणि प्रशासकीय चर्चेचाही विषय आहे. जनतेच्या पैशातून चालणारी प्रत्येक संस्था जनतेसमोर उत्तरदायी असली पाहिजे. तिचे अस्तित्व लोकहितासाठी किती उपयुक्त आहे, याचे प्रामाणिक मूल्यमापन झाले पाहिजे.

लोकशाहीत कोणताही प्रश्न विचारणे चुकीचे नसते. उलट अशा प्रश्नांमुळेच व्यवस्था अधिक सक्षम आणि उत्तरदायी बनते. त्यामुळे आज विचारण्याची वेळ आली आहे विधान परिषद खरोखर लोकशाहीला बळकटी देत आहे की ती केवळ परंपरेच्या नावाखाली टिकून असलेली खर्चिक व्यवस्था ठरत आहे?

या प्रश्नाचे उत्तर राजकीय पक्षांनी नव्हे, तर जनतेने, अभ्यासकांनी आणि लोकशाहीच्या हिताचा विचार करणाऱ्या समाजाने शोधले पाहिजे.

● विलास अरुण मराठे
मो.९८२३०७२७२७

# विरोधक एकवटणार, २३ पक्ष दिल्लीत एकत्र
# जमणार इंडिया आघाडी किती मजबूत?

नवी दिल्ली दि.७ : राजधानी दिल्लीतून मोठी बातमी समोर आली आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतर प्रथमच सोमवारी इंडिया आघाडीतील घटक पक्षांची बैठक होणार आहे. कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये होणाऱ्या या बैठकीत २३ राजकीय पक्ष सहभागी होणार आहेत. यात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह इतर विरोधी पक्षांचे नेते



सहभागी होणार आहेत.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी हे प्रथमच दिल्ली दौऱ्यावर असणार आहेत. हो दोघेही विरोधकांच्या बैठकीला हजेरी लावणार आहेत. मात्र, तामिळनाडू निवडणुकीतील पराभव आणि टीव्हीके सरकारला काँग्रेसने दिलेल्या पाठिंब्यानंतर डीएमकेने इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याची घोषणा केली आहे. डीएमकेच्या नेत्यांनी या बैठकीत सहभागी होण्यास नकार दिला आहे. तसेच आम आदमी पार्टीही बैठकीत सहभागी होण्याची शक्यता कमी आहे. आता उद्याच्या बैठकीत सीपीएम आणि काँग्रेसमधील मतभेद उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

केरळ विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान करण्यात आलेल्या वक्तव्यांवरून काँग्रेस आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) यांच्यातील वादावर बैठकीत चर्चा होण्याची शक्यता (उर्वरित पान २ वर)

# घरगुती गॅस सिलेंडर २९ रुपयांनी महाग

नवी दिल्ली दि. ७ : इराण आणि अमेरिका युद्धात महागाई मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या दरात वाढ होत आहे. होर्मुज खाडी बंद असल्याने भारतात एलपीजी गॅसचा तुटवडा आहे. आखाती देशात सुरू असलेल्या युद्धात अनेक ठिकाणी एलपीजी गॅसच्या प्रकल्पाला टार्गेट करून हल्ले करण्यात आली. ज्याने उत्पादनावर थेट परिणाम होत आहे. भारत एलपीजी गॅस भारतात आणण्याकरिता प्रयत्न करत आहे. यादरम्यानच व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या किमतीमध्ये मोठी वाढ करण्यात आली. मात्र, घरगुती सिलेंडरच्या कितमी सरकारकडून स्थिर ठेवण्यात आल्यात. आता सर्वसामान्य लोकांना मोठा दणका बसला. नुकताच केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत थेट एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीमध्ये मोठी वाढ केली. आता (उर्वरित पान २ वर)



## नदीत बुडून तीन जणांचा मृत्यू

नागपूर दि. ७ : नागपूरमधून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यात असलेल्या महादेव घाट इथे पिकनिकला गेलेल्या तीन जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. कन्हान नदीमध्ये बुडून तिघांचा मृत्यू झाला आहे. कामठी कँटोन्मेंट परिसरात असलेल्या महादेव घाट येथे ही घटना घडली आहे. कामठी आणि नागपूर येथील १२ ते १३ जण पिकनिकसाठी महादेव घाटावर गेले होते. पिकनिक सुरू असताना पोहोण्यासाठी हे तिघे पाण्यात उतरले. परंतु पाण्याचा अंदाज न आल्यानं हे तिघे बुडाल्याची प्राथमिक माहिती समोर (पान २ वर)

## तलावात बुडून तीन जणांचा मृत्यू

छत्रपती संभाजीनगर दि. ७ : शहरातील सातारा परिसरातील साई टेकडीजवळ एक अत्यंत दुर्दैवी आणि काळीज पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. सकाळी हौसेने तलावावर पोहण्यासाठी गेलेल्या ६ मित्रांपैकी ३ जणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पाण्याचा आणि खोलीचा अंदाज न आल्याने एक मित्र पाण्यात बुडू लागला, त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात इतर दोघेही पात्रात ओढले गेले (पान २ वर)

## विषारी गॅसमुळे ४ जणांचा दुर्दैवी मृत्यू

सुरत दि. ७ : गुजरातच्या सूरत जिल्ह्यामध्ये मोठी दुर्घटना घडली. दागिने बनवण्याच्या कारखान्यामध्ये ४ मजुरांचा मृत्यू झाला. सूरत शहरातील अश्विनी कुमार भागात ही घटना घडली. दागिने बनवणाऱ्या कारखान्यात विषारी गॅसने या चौघांचा बळी घेतला. कारखान्यातील मजूर सेप्टिक टँक साफ करत होते त्यावेळी ही घटना घडली. विषारी गॅसमुळे गुदमरून त्यांचा मृत्यू झाला पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी वराछा साखर बाजाराजवळील ईटीपी (उर्वरित पान २ वर)

# मंत्री जर चुकत असेल तर ठोकल्याशिवाय राहू नका : बच्चू कडू

गोंदिया दि. ७ : राज्याच्या राजकारणात दररोज नवनवीन घडामोडी पहायला मिळत आहेत. आज गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे शिवसेनेकडून कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला राज्याचे मंत्री भरत गोगावले, मंत्री आशिष जयस्वाल तसेच शिवसेना नेते व आमदार बच्चू कडू उपस्थित होते. यावेळी शिवसैनिकांना आगामी राजकीय घडामोडी, संघटनात्मक बांधणी इतर मुद्द्यांवर मार्गदर्शन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी भाषण करताना बच्चू कडू यांनी मंत्री जर चुकत असेल तर ठोकल्याशिवाय राहू नका असंही विधान केलं आहे. बच्चू कडू यांनी नेमकं काय म्हटलं ते जाणून घेऊयात.



**एकनाथ शिंदे यांचे कौतुक**

शिवसेनेच्या मेळाव्यात भाषण करताना बच्चू कडू यांनी म्हटले की, 'माझ्यासमोर अनेक पक्षांमध्ये जाण्याच्या वाटा मोकळ्या होत्या. आमचा स्वतंत्र पक्ष होता, अनेक पक्षांमध्ये जाऊन आम्हाला आमचं स्थान निर्माण करता आलं असतं. पण आम्हाला एकनाथ शिंदे खऱ्या अर्थाने मर्द वाटले. त्यांच्याशिवाय दुसरा मर्द नाही त्यामुळे आम्ही शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. (उर्वरित पान २ वर)

## २५ जिल्ह्यांना पावसाचा हाय अलर्ट

पुणे दि. ७ : महाराष्ट्रासाठी आनंदाची बातमी आहे, ती म्हणजे राज्यात मान्सूनचं आगमन झालं आहे. तळ कोकणात मान्सून दाखल झाला आहे. यंदा देशात विलंबनानं मान्सूनचं आगमन झालं. काही दिवसांपूर्वी मान्सून केरळमध्ये दाखल झाला, त्यानंतर आता मान्सून शनिवारीच तळ कोकणात दाखल झाला आहे. दरम्यान या सर्व पार्श्वभूमीवर आता हवामना विभागानं राज्यातील तब्बल २५ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचं आवाहान करण्यात आलं आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार पुढील चार (उर्वरित पान २ वर)

# मराठा आंदोलनातील ५६ गुन्हे मागे

सोलापूर दि. ७ : आरक्षणाच्या मुद्द्याकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी मराठा बांधवांनी रस्त्यांवर उतरून आंदोलने केली. यात सोलापूर शहरात सात आणि ग्रामीणमध्ये ६० गुन्हे दाखल झाले आहेत. त्यातील एकूण ५६ गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. दरम्यान, १ जून रोजी राज्याच्या गृह विभागाने तातडीने सर्वच पोलिस आयुक्त व पोलिस अधीक्षकांकडून तातडीने याची माहिती मागविली. परंतु, हीच माहिती यापूर्वी देखील दिलेली होती, तरीही पुन्हा तीच माहिती मागविल्याची चर्चा पोलिसांमध्ये ऐकायला मिळाली.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मुद्द्यांवरुन पुन्हा एकदा रखरखत्या उन्हातच एल्गार पुकारला होता. राज्य शासनाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार प्रसाद लाढ यांच्या मध्यस्थीतून जरांगे पाटील यांनी आंदोलन एका दिवसात मागे घेतले. या पार्श्वभूमीवर १ जून रोजी राज्याच्या पोलिस महासंचालक कार्यालयाने सर्व शहरांमधील पोलिस आयुक्त, ग्रामीणमधील पोलिस अधीक्षकांकडून मराठा आंदोलकांवर दाखल गुन्हे मागे घेण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची अद्ययावत माहिती मागविली.

त्याच दिवशी (पान २ वर)

## राकाँकडून राजेंद्र जैन यांना राज्यसभेची उमेदवारी

मुंबई दि. ७ : सुनेत्रा पवारांच्या रिक्त जागी राष्ट्रवादी काँग्रेसकडून राजेंद्र जैन यांना संधी मिळाली आहे. सुनील तटकरे यांनी घोषणा केली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीपूर्वी पक्षातील वरिष्ठ नेत्यांची बैठक पार पडली मंत्री छगन भुजबळ यांच्या सातपुडा निवासस्थानी दिलीप वळसे पाटील, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांची बैठक पार पडली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून दिल्ली हायकमांडकडून आलेल्या निरोपाबाबत बैठकीत चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील तटकरे यांनी राजेंद्र जैन हे राज्यसभेचे उमेदवार असतील असे जाहीर केले

## माहोल....




सिलिंडरच्या किमती रॉकेटपेक्षाही वेगाने वर जातायत, यालाच म्हणतात खरा 'विकास'...खिसा रिकामा झाला तरी चालेल, पण देशाचा विकास मात्र झाला पाहिजे!

# जुनच्या शेवटी केंद्रीय मंत्रिमंडळाचा होणार विस्तार

नवी दिल्ली दि. ७ : अनेक दिवसांपासून केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराची चर्चा होत आहे, आता या विस्ताराच्या प्रक्रियेला वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्र्यांचं 'रिपोर्ट कार्ड' तपासण्यात आले आहे. त्यावरून याच महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मोठा फेरबदल होण्याची शक्यता आहे. आगामी वर्षातील उत्तर प्रदेश आणि पंजाबमधील विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे.

या मंत्रिमंडळात पंजाब आणि उत्तर प्रदेशातील बड्या नेत्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात मोठी लॉटरी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांना आगामी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यासाठी राज्यसभेचे तिकीट नाकारण्यात आलंय. त्यामुळे पंजाबमधून भाजपला बळ देण्यासाठी दोन प्रमुख नेत्यांच्या नावांची चर्चा आहे. त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान दिलं जाईल अशी चर्चा सुरू आहे.

यामध्ये पहिले नाव भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ आणि दुसरे नाव आम आदमी पक्षातून नुकतेच भाजपमध्ये दाखल झालेले (उर्वरित पान २ वर)

सरकारमान्य
महाराष्ट्र शासन व इंडियन नर्सिंग काऊंन्सिल मुंबई व्दारा मान्यताप्राप्त
रेणुका कॉलेज ऑफ नर्सिंग (GNM)
Admission Open 2026 - 2027
पात्रता : १२ वी पास (Arts, Commerce & Science)
शिवाजी कॉम्प्लेक्स, मेन बस स्टॉप रोड, अमरावती
मो. 9921616707, 8446576707 8999949112

Biggest Display of
100 + वॉशिंग मशीन
Under One Roof
0% EMI Exchange Offer
Only at केडिया
C/o केडिया मॉल, श्रीकृष्णपेठ मो. 9049912413

अब कॅम्प अमरावती में
मिठाइयाँ नमकीन केक नाश्ता बेकरी प्रोडक्ट
डागा प्लाझो, डी मार्ट के सामने, कॅम्प, अमरावती
85000-11122 | 80015-56000
रघुवीर मिठाइयाँ

संपूर्ण लग्न बस्ता
आराधना होलसेल शॉपिंग मॉल
• बनारसी शालू • डिझायनर साड्या • घागरा ओढवी • सलवार सुट
• ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट • सुटिंग-शर्टिंग • टिवेज वेअर • किड्स वेअर
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सँडल | होम डेकोर | मॅचिंग
जवाहर रोड, अमरावती. ✆ 2574594
L -2, बिझीलँड, नांदगावपेठ, अमरावती.

■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ■ अमरावती ■ यवतमाळ ■ अकोला ■ बुलढाणा ■ वाशिम